Pune Police

प्रेसनोट दि ०२/०८/२०१७

**पेट्रोलपंपावर दरोडा घालण्याच्या तयारीत आलेल्या शिकलगरी टोळीतील दरोडेखोरांना गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडून अटक करण्यात आली आहे.**

दि. ०१/०८/२०१७ रोजी २१.०५ दरोडा प्रतिबंधक पथकातील, पोना २७२१ प्रमोद गायकवाड व पोहवा ४२९० काटम यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील घरफोडी व दरोडा गुन्हे करणारे वैदुवाडी बिराजदार नगर हडपसर येथील शिकलकरी गुन्हेगार व त्यांचे साथिदार हे पुणे-सोलापुर रोडवरील एआयपीटी, समोर असलेल्या पेट्रोल पंपावर दरोडा टाकणार असुन ते पेट्रोलपंपा जवळ दबा धरुन थांबलेले आहेत त्यांच्या जवळ पांढ-या रंगाची मारुती झेन कार क्र एमएच/१२/सीडी/१८४५ ही गाडी आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळालेने दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र कदम यांनी अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची दोन वेगवेगळी पथके तयार करुन पुणे-सोलापुर रोडवरील एआयपीटी, समोर असलेल्या पत्र्याचे कंपाउंड जवळ आलो असता बातमीतील वर्णनाची मारुती झेन कार क्र एमएच/१२/सीडी/१८४५ ही गाडी थांबली असलेली निर्दशनास आली असता पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम व त्याच्याकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अचानकपणे चारी बाजूने सदर ठिकाणी २१/०५ वा छापा टाकून गाडीमधील दरोड्याच्या तयारीत असणा-या इसमांना जागीच पकडण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनी पळुन जाणेचा प्रयत्न केला असता, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी स्टाफचे मदतीने योग्य तो बळाचा वापर करुन पाच जणापैकी चौघांना पकडुन ताब्यात घेतले आहे. त्यांची नावे १)जयसिंग काळुसिंग जुनी, वय २७ वर्षे रा. सर्व्हे नं.८६ वैदुवाडी बिराजदार नगर हडपसर पुणे २)सोमनाथ नामदेव घारोळे वय २१ वर्षे रा. सदर ३)उमेश हरीचंद्र गायकवाड वय २३ वर्षे, रा. सर्व्हे नं. ८६ वैदुवाडी बिराजदार नगर हडपसर पुणे ४)जलसिंग रजपुतसिंग दुधाणी वय २३ वर्षे रा.सर्व्हे नं ११० वैदुवाडी अंधशाळे मागे हडपसर पुणे अशी आहे. तसेच त्यांचेपैकी एकजण अंधाराचा फायदा घेवून पळून गेला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींनी पळुन गेलेल्या इसमाचे नाव अर्जुनसिंग दुधाणी रा. रामटेकडी, पुणे असे असल्याचे सांगितले आहे.

दरोडेखोरांचे ताब्यातुन मारुती झेन कार क्र एमएच/१२/सीडी/१८४५ कि.रु. २,००,०००/- व दरोड्याची साधने एक छ-याची पिस्टल, १ स्ट्रीलचा चायनिज चॉपर, सेल्फ डिफेन्स स्प्रे १, स्क्रू ड्रायव्हर, लायटर, १ पक्कड, १ टॉर्च, २ कोयते व असा सर्व मिळुन कि.रु. २,०१,९७०/- चा माल दरोडयाची साधणे व प्राण घातकशस्त्र जप्त करण्यात आली आहेत. अटक आरोपीविरुध्द वानवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४०६/२०१७ भादवि कलम ३९९, ४०२, आर्म अॅक्ट कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

अटक आरोपी यांचेविरुध्द घरफोडी चोरी व शरीराविरुध्दचे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण ढेंगळे, पोलीस उप निरीक्षक संजय दळवी, पोलीस कर्मचारी विनायक पवार, शंकर पाटील, राहुल घाडगे, दत्तात्रय काटम, विलास कांबळे, बशीर सय्यद, परवेज जमादार, प्रमोद गायकवाड, मल्लिकार्जुन स्वामी, रामदास गोणते, विल्सन डिसोझा, धनाजी पाटील व प्रविण जाधव यांनी केली आहे.

